पुढारी

# विद्यार्थ्यांकडे प्रॉडक्ट म्हणून पाहू नका

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : घाळी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेला प्रारंभ

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांकडे प्रॉडक्ट म्हणून पाहू नका. त्यांना ज्ञान, संस्कार दिल्यानंतर त्यांच्यातून एक सच्चा माणूस मिळू शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. येथील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रत्नमाला घाळी तर प्रमुख उपस्थित म्हणून विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे होते.

स्वागत सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शिवाजी भुकेले यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. एन. बी. मासाळ यांनी करून दिली. यावेळी बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाच्या बाहेर पडणे आवश्यक आहे. त्यांनी सामाजिक गोष्टींचे विश्लेषण करून विविध कला-कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. हीच कला-कौशल्ये समाधानी जीवनाची साधने आहेत.

संस्कार, ज्ञान, हिंमत याच्या जोरावर यश मिळविता येते. त्याची स्वत:ला सवय लावून घ्या. काम करताना कारणे सांगू नका. कारण यशस्वी लोक कधीही कारणे सांगत नाहीत. हरणाऱ्यालाही तुमचा अभिमान वाटेल, असे यश मिळवा.

यावेळी डॉ. डी. आर. मोरे, संस्था कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अरविंद कित्तूरकर, डॉ. शिवकुमार कोल्हापूरे, महेश घाळी, किशोर हंजी, बी. जी. भोसकी आदी उपस्थित होते. डॉ. एस. बी. भांबर यांनी आभार मानले.



गडहिंग्लज : राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर रत्नमाला घाळी, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. सतीश घाळी, डॉ. मंगलकुमार पाटील आदी.

### राज्यभरातील ५५ स्पर्धक सहभागी

*या स्पर्धेचे हे ३० वे वर्ष आहे. या स्पर्धेत दरवर्षी महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होतात. यंदाही पुणे, औरंगाबाद, उस्मानाबाद, अकलूज, नांदेड, सोलापूर, सातारा, मुंबई, इस्लामपूर, कोल्हापूर, सांगली येथून ५५ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. यामुळे या स्पर्धांतून दरवर्षी नवीन वक्ते घडण्यास मदत होते.*

लोकमत

## देवानंद शिंदे : गडहिंग्लजमध्ये स्पर्धा परीक्षार्थींना मूलमंत्र

# दुसऱ्याशी नको स्वत:शीच करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : केवळ ज्ञान आणि आत्मविश्वासाच्या बळावरच संधीच्या अवकाशात उत्तुंग झेप घेणे शक्य आहे. मात्र, दुसऱ्याशी तुलना करण्यात वेळ घालवू नका, तेवढ्या वेळेत आपल्यातील क्षमता विकसित करा. स्पर्धा दुसऱ्याशी न करता स्वत:शी केल्यास कोणत्याही क्षेत्रातील यश दूर नाही, हा यशाचा मूलमंत्र कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी दिला.

येथील 'झेप' ॲकॅडमीच्या सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिंदे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड धाडस व गुणवत्ता आहे. परंतु, न्यूनगंडाची मानसिकता बदलण्याची गरज आहे.

मोरे म्हणाले, ब्रिटिश काळापासून गडहिंग्लजला मोठी शैक्षणिक परंपरा आहे. सामाजिक बांधीलकीतून सुरु झालेल्या 'झेप'मधून निश्चितच चांगले अधिकारी निर्माण होतील.



गडहिंग्लज येथे झेप अकॅडमीच्या विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एम. एल. चौगुले, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा. डॉ. एस. बी. भांबर उपस्थित होते.

### 'संधी' आणि 'सूर्योदय'

कोणतीही संधी ही सूर्योदयासारखी असते. सूर्योदयाची वेळ साधण्याप्रमाणेच संधीचीही वेळ साधा. ज्ञान व आत्मविश्वासाच्या पंखांनी संधीच्या अवकाशात उत्तुंग झेप घ्या आणि संधीचे यशात रुपांतर करा, असा मूलमंत्र कुलगुरु डॉ. शिंदे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी प्रा. डॉ. डी. के गायकवाड, प्रा. डी. टी. गायकवाड, डॉ. दत्ता पाटील, प्रदीप अभ्यंकर, प्रा.आप्पासाहेब आरबोळे, डॉ.सुभाष पाटील व रंगा शिंगटे,प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, प्राचार्य डॉ. कुरळपकर, नंदकुमार मोरे, विजय आरबोळे, रामगोंडा पाटील, प्रा. मनोहर पुजारी, प्रा. नागेश मासाळ, प्रा. ज्ञानराजा चिघळीकर आदींसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. सागर माने यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 2018
तरुण भारत



गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शेजारी रत्नमाला घाळी, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. सतीश घाळी, प्राचार्य मंगलकुमार पाटील, अरविंद कित्तूरकर आदी.

# स्पर्धेतूनच खरी ओळख बनविण्याची संधी

**प्रतिनिधी**
गडहिंग्लज

स्पर्धेच्या युगात अपयशाने खचून न जाता, अपयशच आपल्याला प्रेरणा देणारी संधी समजून यशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करावा. व्यक्तीची खरी ओळख करण्याची संधी स्पर्धेतूनच मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील डॉ. घाळी कॉलेजमध्ये बुधवारी डॉ. एस. एस. घाळी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राज्यस्तरीय वक्तृत्व आणि काव्यवाचन स्पर्धेचे उद्घाटन झाले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्षा रत्नमाला घाळी होत्या. विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. शिवाजीराव भुकेले यांनी केले. प्रा. एन.बी. मासाळ यांनी मान्यवरांचा परिचय करुन दिला.

शिंदे म्हणाले, प्रशालेत विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवून अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करावा. संस्थेने स्पर्धेची ज्योत राज्यभरात पोहचवून प्रकाशीत करण्याचे काम केले आहे. यापूढे ही स्पर्धा देशपातळीवर आयोजित करावी. या उपक्रमाला विद्यापीठाचे पाठबळ असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. सतिश घाळी, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद कितुरकर, संचालक महेश घाळी, संजू घाळी, आय. जी. फुटाणे, किशोर हंजी, एम. एल. चौगुले उपस्थित होते. सुत्रसंचालन आरती भालेकर, यांनी केले. आभार प्रा. पी. एल. बिराजदार यांनी मानले.

**ज्ञान, भान आणि मान...**

डॉ. शिंदे म्हणाले, जर यशस्वीतेकडे वाटचाल करावयाची असेल तर योग्य दिशाचे ज्ञान, बोलताना शब्दाचे भान आणि वरिष्ठांचा मान यांचा अवलंब झाला तर यशाला कोणी रोखू शकत नाही. त्यामुळे ज्ञान, भान, मान हे यशस्वी होणाचे मार्ग त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.